# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## अपिल क्र.मुमाआ/नों.क्र.२११७८७/२०२१/४४१८/२०२६

श्री.शंकर नामदेव कड
मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (नियोजन-२)
सार्वजनिक बांधकाम विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (नियोजन)
सार्वजनिक बांधकाम विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०९.२०२० | -- | १२.११.२०२० | ०४.१२.२०२० |

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, प्राधिकरणाच्या वतीने विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती ज्योती हणमंते कपाळे तसेच प्रथम अपिलिय अधिकारी श्री.अजित काटकर उपस्थित असून कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीवरून अपिलार्थींना जन माहिती अधिकारी स्तरावर उपलब्ध असलेल्या माहिती संदर्भात छायांकित प्रत देण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. तसेच या संदर्भात तत्कालीन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८/१२/२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती मात्र माहिती मिळाली नसल्याचा तसेच हेतूपुरस्सर जाणीवपूर्वक माहिती देण्याची टाळाटाळ केली असल्याचा आक्षेप नोंदवून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. दाखल केलेला अर्ज हा कोविड-१९ कालावधीचा असल्याने कोविड-१९ कालावधीत झालेला विलंब हा माननीय सर्वोच्च न्यायालय, माननीय उच्च न्यायालय यांच्या निर्देशाप्रमाणे क्षमापित करण्यात आला आहे. तथापि, त्या कालावधीत अपिलार्थींना अपेक्षित असलेली माहिती म्हणजेच मुख्याधिकारी, नगरपरिषद, चाकण यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग येथील चाकण नगरपरिषद हद्दीतील विकास कामासंदर्भात पाठविलेल्या प्रस्तावावर झालेल्या प्रगती बाबत

माहिती विचारली असून यासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाला असल्याबाबत अभिलेखात नोंद नसल्याचे नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विद्यमान अपिलिय अधिकाऱ्यांनी प्रशासकीय पातळीवर संबंधित नगरपरिषदेद्वारा प्राप्त झालेला प्रस्ताव, त्यावर करण्यात आलेली कार्यवाही या संदर्भातील माहिती संबंधित नगरपरिषदेकडून तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित उपविभागाकडून प्राप्त करून घेवून अपिलार्थीना **विनामूल्य प्रदान** करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र.४४१८/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : ०१-०६-२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**